# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक 513 दिनांक 1 ऑगष्ट 1923 द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 द्वारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**परीक्षा भवन, एल. आय. टी. परिसर, अमरावती रोड, नागपूर – 440033**
**दुरध्वनी क्र. 0712–2523298, 6566875** **फॅक्स क्र. 0712–2546263**

क्र. गोप./7362 दिनांक :–26/08/2018

**प्रति,**

**प्राचार्य /संचालक/ विभागप्रमुख**
सर्व संलग्नीत महाविद्यालये, आणि विद्यापीठाचे
**संचालित महाविद्यालये/पदव्युत्तर विभाग.**

**विषय** :– हिवाळी 2018 च्या प्रात्यक्षिक परीक्षा तसेच सेशनल गुणांबाबत.

**महोदय /महोदया,**

आपणांस कळविण्यात येते की, हिवाळी – 2018 च्या प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीत आपल्या महाविद्यालयात आयोजित करावयाच्या आहेत.

पदवी/पदव्युत्तर सत्रपध्दती परीक्षा.

(अ) सर्व परीक्षा दिनांक 01–10–2018 ते 05–11–2018

आपल्या महाविद्यालयात वरीलप्रमाणे नमुद वर्गाची प्रात्यक्षीक परीक्षा उपरोक्त कालावधीमध्ये सुचविलेल्या तारखेदरम्यान आयोजीत करावयाची असून त्याअनुषंगाने तारीख तसेच अंतर्गत परीक्षकांची नांवे दिनांक 30–09–2018 पर्यंत गोपनीय विभागात विशेष दुतामार्फत कळवुन त्याची पोच घ्यावी.

तसेच सर्व परीक्षेचे सेशनल गुण पत्रके हे लेखी परिक्षा सुरु होण्याच्या तीन दिवस आधी ऑनलाईन **college.rtmnuresults.org** या संकेत स्थळावर विद्यार्थ्यांचे परिक्षा क्रमांका सहित (**Roll No.**) त्याची हार्ड कॉपीवर विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांची स्वाक्षरी घेवून प्राचार्य/विभागप्रमुख हयांचे स्वाक्षरीनिशी गोपनीय विभागास सादर करुन त्याची पोच घ्यावी.

वेळेनंतर आलेले सेशनल गुण परिपत्रक क्रमांक 1252 दिनाक 08–11–2016 नुसार प्रती दिन रु 1000/– प्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच ज्या महाविद्यालयात एकही विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नाही, अश्या महाविद्यालयातील

...... 2 ......

विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण महाविद्यालयाच्या (संस्थेच्या) अध्यक्ष किंवा सचिव यांना प्रदान करता येणार नाही. ज्या महाविद्यालयामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षक नसलेल्या महाविद्यालयांनी अध्यक्ष किंवा सचिवांच्या स्वाक्षरीने अंतर्गत गुण विद्यापीठाकडे सादर करु नयेत.

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयात संबंधित वर्गाची प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यावर, परीक्षा क्रमांकासहित त्यांचे गुणपत्रक ऑनलाईन **college.rtmnuresults.org** या संकेत स्थळावर पाठवुन त्याची हार्ड कॉपी अंतर्गत व बाहय परीक्षकांच्या स्वाक्षरीनिशी मोहरबंद लिफाफ्यात पुढील 24 तासाच्या आंत गोपनीय विभागास विशेष दुतामार्फत त्यावर परिक्षेचे नाव, वर्ष, वर्ग, प्रात्यक्षिक परीक्षेचा विषय इत्यादी नमुद करुन सादर करावे, अन्यथा प्रात्यक्षिक परिक्षांच्या गुणांचे मोहरबंद लिफाफे स्वीकारल्या जाणार नाही.

जर प्रात्यक्षीक परीक्षा ही सुरु झाल्यानंतरही विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांचे परीक्षा क्रमांक (**Roll No.**) प्राप्त झाले नसेल, अश्या वेळेस प्रात्यक्षीक परीक्षेचे वेळी विद्यार्थ्यांचे नाव व त्यांची स्वाक्षरी घेवून प्रात्यक्षीक परीक्षेचे गुण अंतर्गत व बाहयपरीक्षकांच्या स्वाक्षरीनिशी प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख हयांचेकडे सिलबंद लिफाफ्यात जमा करावी, विद्यापीठातर्फे परीक्षा क्रमांक (**Roll No.**) प्राप्त होताच प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख नमुद संकेतस्थळावर गुणपत्रक ऑनलाईन पाठवून त्याची हार्ड कॉपी गोपनीय विभागात विशेष दुतामार्फत सादर करतील.

ज्या विद्यार्थ्यांचे गुणपत्रक ऑनलाईन होत नसेल, अश्या विद्यार्थ्यांचे गुणपत्रक विद्यार्थ्यांच्या नावासहीत, परीक्षा क्रमांकासहित Manually भरुन स्वाक्षरीनिशी सादर करावे.

तसेच उपरोक्त माहितीनुसार कळवून सुध्दा बरेच महाविद्यालयातुन चुकीचे गुणांबाबत पत्रव्यवहार करण्यात येतो. झालेली चुक ही महाविद्यालय स्तरावर झाल्याने गुणांत दुरुस्ती करता येणार नाही, हयाची नोंद घ्यावी व गुणांबाबत संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/विभागप्रमुख/संचालक जबाबदार राहतील.

करीता सेशनल गुण व प्रात्यक्षीक परीक्षेचे गुण हे काळजीपुर्वक कसल्याही प्रकारच्या चुका न करता ऑनलाईन कराव्यात, निकाल जाहीर झाल्यानंतर हयामध्ये कोणताही बदल/दुरुस्ती होणार नाही, हयाची नोंद घ्यावी.

कृपया वरील बाबींची नोंद घेवून योग्य कार्यवाही करावी.

आपला

(डॉ.निरज खटी)
संचालक
(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)
राष्टसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ,नागपूर